**व्यक्तिगत परदेशी चलनाचे व्यवहार सोपे :**
**<u>रिझर्व्ह बँक तारापोर समितीच्या शिफारसींची अंमलबजावणी करणार</u>**

व्यक्तींचे परदेशी चलनातील व्यवहार हे त्यांच्या रुपयांमधील व्यवहारांइतके सोपे व्हावेत या साठी भारतीय रिझर्व्ह बँकेने अनेक उपाय योजना सुरु केल्या आहेत. या उपाय योजनांमध्ये फेब्रुवारी २००४ मध्ये २५००० अमेरिकन डॉलर पर्यंत व्यक्तिगत भरणा करण्याच्या एका मुक्त केलेल्या योजनेचा, आणि कर्मचाऱ्यांना सवलतीच्या दरात स्टॉक ऑप्शन्स देण्यासाठीचा निर्बंधात्मक नियम काढून टाकण्याचा समावेश आहे. तसेच रिझर्व्ह बँकेने परदेशी चलन व्यवस्थापन कायदा १९८९ ची अंमलबजावणी हाताळणाऱ्या विभागाचे पूर्वीचे 'एक्सचेंज कंट्रोल डिपार्टमेंट' हे नाव बदलून 'फॉरेन एक्सचेंज डिपार्टमेंट' असे केले आहे, व त्याचे एका कार्यक्षम कृतिदल (टास्क फोर्स) मध्ये रुपांतर केले आहे. या खेरीज रिझर्व्ह बँकेने बँकांना सांगितले आहे, की बँकांनी त्यांच्या अधिकृत व्यापारी शाखांमध्ये, जेथे ग्राहकांशी प्रथम संपर्क येईल, अशा ठिकाणी प्रशिक्षित कर्मचारी नेमण्याची सोय करावी.

आपणास आठवत असेल की नोव्हेंबर २००३ मध्ये स्वीकारलेल्या 'मिड-टर्म रिव्ह्यू मॉनेटर अँड क्रेडिट पॉलिसी'चा पाठपुरावा करण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेने 'प्रोसिजर्स अँड परफॉर्मन्स ऑडिट ऑन पब्लिक सर्व्हिसेस' साठी एक समिती नेमली होती (अध्यक्ष : श्री. एस. एस. तारापोर, माजी डेप्युटी गव्हर्नर, भारतीय रिझर्व्ह बँक). तारापोर समितीने व्यक्तिगत ग्राहकांच्या व्यवहारांवर परिणाम करत असलेल्या रिझर्व्ह बँकेच्या कार्यपद्धतींचे व प्रत्यक्ष कार्यवाहीचे परीक्षण केले. या कार्यपद्धती, व प्रत्यक्ष कार्यवाही, चार वेगवेगळ्या कार्यक्षेत्रांशी संबंधित होत्या. या मध्ये परदेशी चलन, शासकीय व्यवहार, बँकिंगचे कार्य व चलन व्यवस्थापन यांचा समावेश होता. तारापोर समितीने आपला अहवाल जानेवारी ते एप्रिल २००४ च्या दरम्यान सादर केला. रिझर्व्ह बँकेने तारापोर समितीच्या शिफारसींचे परीक्षण करुन प्रत्येक कार्यक्षेत्रा मध्ये त्यांची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने पावले उचलली आहेत. प्रत्येक क्षेत्रातील रिझर्व्ह बँकेची कार्यवाही स्वतंत्रपणे निवेदित केली जात आहे.

रिझर्व्ह बँकेने तारापोर समितीच्या शिफारसी बँकांना त्यांच्या 'प्रोसिजर्स अँड परफॉर्मन्स ऑडिट ऑन पब्लिक सर्व्हिसेस' साठी असलेल्या समित्यांमार्फत पाठपुराव्याच्या कार्यवाहीसाठी पाठविल्या आहेत. भारतीय रिझर्व्ह बँकेने या तदर्थ समित्यांना विशेषतः व्यक्तींच्या व्यवहारांच्या दृष्टीने या कार्यक्षेत्रांमधील कार्यपद्धती व कार्यवाही सोप्या करण्यासाठी योग्य ती पावले टाकण्यास सांगितले आहे. रिझर्व्ह बँकेने बँका पातळीवरील तदर्थ समित्यांना सांगितले आहे, की ग्राहकाचा जेथे प्रथम संपर्क होईल अशा ठिकाणी प्रशिक्षित व सर्व माहिती असलेल्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती असल्याची खात्री करुन घ्यावी.

**अल्पना किल्लावाला**
मुख्य महाव्यस्थापक

**प्रेस रिलीज : २००३ – २००४ / १३७७**